।। सा विद्या या विमुक्तये ।।

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED

"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)

Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

## ACADEMIC (APPROVAL) SECTION

Phone: (02462) 229242
FAX No. (02462) 229574

Website: srtmun.ac.in
E-mail : approvalsrtmun@gmail.com


जावक क्र.शैक्ष/मान्यता/०२/२०१९–२०/3944. दिनांक : ०८ जुन, २०२०

प्रति,

मा. अध्यक्ष/सचिव/प्राचार्य,
सर्व संलग्नीत महाविद्यालये
प्रस्तुत विद्यापीठ.

विषय : विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयातील शिक्षकांच्या कायम मान्यतेबाबत.

संदर्भ : १) विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्लीचे विनियम २०१०
२) प्रस्तुत विद्यापीठाचे परिनियम S.176.
३) या कार्यालयाचे पत्र क्र.शैक्ष/मान्यता/०२/२०१८–१९/२८१७, दिनांक ०४/०२/२०१९.
४) दिनांक १४/०३/२०२० रोजी आयोजित मा. अधिसभा बैठक

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयी संदर्भीय पत्राच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना या पत्राद्वारे कळविण्यात येते की, महाविद्यालयात नियीमत प्रक्रिया होवून सेवेत असलेले परिविक्षाधीन कालावधीवरील कार्यरत असलेल्या शिक्षकांना त्यांचा परिविक्षाधीन कालावधी पुर्ण झाल्यानंतर संस्थेने संबंधितांना प्रस्तुत विद्यापीठाचे परिनियम S.176 नुसार कायम करणे बाबतची कार्यवाही करणे आवश्यक आहे. परिविक्षाधीन कालावधी समाधानकारक पुर्ण करणाऱ्या शिक्षकास सेवेत कायम करण्याची कार्यवाही परिनियमातील तरतुदीनुसार संस्थेकडून पुर्ण करावी, अन्यथा संबंधीत शिक्षक विद्यापीठ परिनियम S.176(4)(c) नुसार सेवेत कायम असल्याचे (Deemed to be confirm) गृहीत राहील असे उपरोक्त संदर्भ क्र. ०३ च्या परिपत्रकान्वये कळविण्यात आले होते.

मा. अधिसभा बैठक दिनांक १४/०३/२०२० मध्ये झालेल्या निर्णयाप्रमाणे खालील प्रमाणे बदल करण्यात येत आहे. संस्थेने प्राचार्य/शिक्षकांच्या परिविक्षाधीन कालावधी समाधानकारकरित्या पुर्ण झाल्यानंतर संबंधीत शिक्षकांना परिनियमातील तरतुदीनुसार कायम (Confirm) करून संबंधीतांचे प्रस्ताव पुर्वी प्रमाणे विद्यापीठाकडे पाठविण्यात यावेत. सदर प्रस्ताव नियमानुसार बरोबर असल्यास त्याप्रमाणे कार्यवाही केली जाईल, जर परिपत्रकान्वये प्रस्ताव महाविद्यालयामार्फत आले नाहीत तर सर्व प्रक्रियेनंतर विद्यापीठ एकतर्फी कार्यवाही करेल, कृपया सर्व संबंधीतांनी याची नोंद घ्यावी.

उपकुलसचिव
शैक्षणिक (मान्यता) विभाग

प्रत माहितीस्तव:
१) मा.शिक्षण सहसंचालक, (उच्च शिक्षण) शिक्षण सहसंचालनालय, नांदेड विभाग, नांदेड.
२) मा.कुलसचिव यांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
३) सिस्टीम एक्सपर्ट, शैक्षणिक विभाग, प्रस्तुत विद्यापीठ यांना देवून कळविण्यात येते की, सदर पत्र विद्यापीठाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करावे.

Scanned with CamScanner